नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २६३ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
Email id : aklgavakari@gmail.com, arote.vishwas@gmail.com
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई...
AVP NEWS | समर्थ गांवकरी NEWS
।। जय भगवान ।।
महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वास आनंदराव आरोटे
मा. मानजीभाई खेमजीभाई ठक्कर, समुह संपादक, दानशूर व्यक्तिमत्व
न्याय, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता... हीच आमची ओळख! | बातम्या, जाहिराती व सदस्यता साठी संपर्क साधा.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण, मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासून २००० के व्ही ए
जनरेटर विक्री | दुरुस्ती व देखभाल | तज्ज्ञ तंत्रज्ञ | विश्वासाई सेवा वेळेत काम
संपर्क: +91-8286562340 / 9004511593, 8652653990 / 8286562350
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053, Sector - 5, Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com | Website: www.adarshengineering.net

रविवार दि. ०६ सेप्टेंबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक





कुटे हॉस्पिटलच्या संचालिका आणि प्रथितयश भूलतज्ज्ञ

डॉ. सोनाली प्रदीप कुटे

यांना वाढदिवसाच्या

- शुभेच्छुक -

कुटे हॉस्पिटल अ‍ॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर

हार्दिक शुभेच्छा!






सर्जरी विभाग :
अपघात विभाग :
सुपर स्पेशिलीटी विभाग :
अतिदक्षता विभाग :
डायलीसिस विभाग :
न्युरो विभाग :
हृदयरोग विभाग :
तपासणी व निदान

राज्य कर्मचारी विमा योजना (ESIC) विभाग नव्याने सुरू

GE IGS 320 OMEGA INNOVA SPIN INDIA SKD CATHLAB अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिलीच कॅथलॅब



हृदय विकार...अचूक निदान, योग्य उपचार, माफक दरात सर्वांसाठी....

- कंसल्टेशन
- ईसीजी
- २ डी इकोकार्डिओग्राफी
- बलून वॉल्वोटॉमी
- अँजिओग्राफी
- अँजिओप्लास्टी
- पेसमेकर
- डिव्हाईस क्लोजर
- स्ट्रेस टेस्ट
- होल्टर मॉनिटरींग
- आय व्ही सी फिल्टर
- अँब्युलेटरी बी.पी. मॉनिटरींग



• जटील व दुर्मिळ प्रक्रिया •

- सीटीओ अँजिओप्लास्टी
- बायफरकेशन अँजिओप्लास्टी
- लेफ्ट मेन अँजिओप्लास्टी
- रेट्रोग्रेड अँजिओप्लास्टी
- रोटा व आयव्हीयुएस मार्गदर्शित
- जटील अँजिओप्लास्टी

MPKAY | ECHS | CM RELIEF FUND

प्रधानमंत्री व महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी व निवडक शस्त्रक्रिया मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील.*

सर्व मेडिक्लेम्स व कॅशलेस सुविधा उपलब्ध !

चौकशीसाठी संपर्क नं. : 888 888 2225
हृदयरोग विभाग संपर्क नं. : 888 837 2225
वैद्यकीय मदत (आण्णासाहेब थोरात) मॅनेजर : 888 873 2225

४० फुटी डि.पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अहिल्यानगर फोन (०२४२५) २२६६८८,२२६६८६

# उपेक्षित कलेला मिळाली नवी उभारी; जामखेडच्या नटराज कलाकेंद्रात लावणी महोत्सव संपन्न

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड येथील नटराज कलाकेंद्रात पारंपरिक आणि लोककलेवर आधारित लावणी महोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. ढोलकीचा ठेका, घुंगरांचा नाद, लावणीतील ठसकेबाज अदाकारी आणि कलाकारांच्या सादरीकरणाने संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. मात्र, या रंगमंचावर दिसणाऱ्या मनोरंजनाच्या मागे असंख्य कलाकारांचे कष्ट, संघर्ष आणि त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाची कहाणी दडलेली आहे.

लावणी म्हटले की अनेकांच्या डोळ्यासमोर केवळ मनोरंजनाचे चित्र उभे राहते. मात्र, ग्रामीण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात या कलेचे स्थान यापेक्षा कितीतरी मोठे आहे. पिढ्यान् पिढ्या जपली गेलेली ही लोककला आजही अनेक कलाकारांच्या जगण्याचा आधार बनली आहे. जामखेड परिसरातील विविध कलाकेंद्रांच्या माध्यमातून ही परंपरा पुढे नेण्याचे काम सातत्याने सुरू आहे.

कलेच्या रंगमंचामागे संघर्षाचे आयुष्य

कलाकेंद्रातील कार्यक्रम सुरू असताना रंगमंचावर कलाकार आपल्या कलेतून प्रेक्षकांचे मनोरंजन करतात; मात्र पडद्यामागे त्यांच्या आयुष्याचा संघर्ष सुरू असतो. या कलेवर हजारो महिला कलाकार आपली कला आणि मेहनत पणाला लावून काम करीत आहेत. अनेक कलाकारांसाठी हे केवळ हौसेचे किंवा छंदाचे क्षेत्र नसून त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे.

घरची परिस्थिती सांभाळत, कुटुंबाची जबाबदारी पेलत आणि आपल्या कलेला जपत अनेक महिला कलाकार या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या पावलांतील घुंगरू केवळ तालावर वाजत नाहीत, तर त्या घुंगरांच्या आवाजात त्यांच्या मेहनतीची आणि जगण्याची कहाणीही दडलेली आहे.

एका कलाकाराच्या कमाईवर अनेकांचे संसार

कलाकेंद्रावर केवळ कलाकारच अवलंबून नसतात. कार्यक्रमाच्या आयोजनापासून ते वादक, प्रकाशयोजना, ध्वनिव्यवस्था, रंगमंच व्यवस्था, वेशभूषा, मेकअप, वाहतूक आणि इतर विविध कामे करणाऱ्या अनेक कामगारांचेही या व्यवसायावर जीवन अवलंबून आहे. त्यामुळे एका लावणी कार्यक्रमामागे अनेक कुटुंबांच्या रोजगाराची साखळी जोडलेली असते. कलाकार रंगमंचावर येतो आणि कार्यक्रम संपल्यानंतर परत जातो; पण त्याच कार्यक्रमामुळे अनेकांच्या घरातील चूल पेटते. त्यामुळे या कलेचे महत्त्व केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नसून त्याला सामाजिक आणि आर्थिक बाजूही आहे.

जामखेडच्या बाजारपेठेलाही हातभार

जामखेड परिसरातील कलाकेंद्रांमुळे स्थानिक बाजारपेठेलाही अप्रत्यक्षपणे मोठा आधार मिळतो. कार्यक्रमांसाठी लागणारी विविध साहित्ये, कपडे, वेशभूषा, दागिने, मेकअप साहित्य, खाद्यपदार्थ, वाहतूक तसेच इतर छोट्या–मोठ्या सेवांमधून स्थानिक व्यावसायिकांना रोजगार मिळतो.

कलाकार, कामगार, छोटे व्यापारी आणि सेवा देणारे अनेक घटक या व्यवस्थेशी जोडले गेले आहेत. त्यामुळे कलाकेंद्रांची चाके फिरत राहिली तर त्याचा परिणाम अनेक कुटुंबांच्या अर्थकारणावर होत असतो.

ग्रामीण महाराष्ट्राच्या मनोरंजनाची जपलेली परंपरा

ग्रामीण भागात आज आधुनिक मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध झाली असली तरी पारंपरिक लावणी आणि लोककलेचे आकर्षण आजही कायम आहे. गावोगावी होणारे कार्यक्रम, यात्रा–जत्रा आणि विविध सांस्कृतिक सोहळ्यांच्या माध्यमातून ही कला प्रेक्षकांपर्यंत पोहोचते.

या कलेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांचे मनोरंजन तर होतेच; पण त्याचबरोबर महाराष्ट्राची लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वारसाही जिवंत राहतो. बदलत्या काळात अनेक पारंपरिक कला लोप पावत असताना कलाकेंद्रातील लावणीसारखी कला आजही रंगमंचावर टिकून आहे, यामागे कलाकारांची मेहनत आणि कलाकेंद्रांची भूमिका महत्त्वाची आहे.

घुंगरांचा आवाज थांबू नये...

नटराज कलाकेंद्रातील लावणी महोत्सवात कलाकार मोहिनी पवार, निकिता पवार, निशा पवार, काजल जाधव, पुनम जाधव, रेश्मा पवार, स्वाती पवार, मंजु पवार, सुजाता पवार, शितल जाधव व सनी जाधव यांनी आपली कला सादर केली. रंगमंचावर कलाकारांच्या सादरीकरणाला मिळणारी दाद त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणते; मात्र त्या टाळ्यांच्या पलीकडे त्यांचे रोजचे जगणे आणि संघर्षही तितकाच महत्त्वाचा आहे. ज्या कलेच्या माध्यमातून अनेक कलाकार आपल्या कुटुंबाचा संसार चालवतात, अनेक कामगारांना रोजगार मिळतो आणि जामखेडच्या बाजारपेठेला आर्थिक चालना मिळते, त्या कलेला जपणे ही समाजाचीही जबाबदारी आहे. घुंगरांचा नाद, ढोलकीचा ठेका आणि लावणीच्या माध्यमातून जिवंत राहिलेली महाराष्ट्राची लोकपरंपरा अशीच पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचत राहावी, हीच या महोत्सवातून व्यक्त झालेली खरी भावना आहे.



# प्रवरासंगम येथे गोकुळाष्टमी निमित्त आयोजित कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील टोका–प्रवरासंगम येथे जय मल्हार मित्र मंडळाच्या वतीने गोकुळाष्टमी दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने ग्रामीण भागातील खेळाडूंना वाव देण्यासाठी आयोजित कबड्डी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या स्पर्धेचे उदघाटन महंत श्री सुनीलगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रवरासंगम येथील श्री सिद्धेश्वर हायस्कूलच्या प्रांगणात माजी मंत्री शंकरराव गडाख मित्र मंडळाच्या खंबीर साथीने व युवा नेते उदयन दादा गडाख पाटील यांच्या प्रेरणेने सदरच्या कबड्डी स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या

या स्पर्धेचे उदघाटन श्रीराम साधना आश्रमाचे महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या हस्ते व पोलीस निरीक्षक प्रताप दराडे,मुळा कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाळासाहेब पाटील,प्रवरासंगमचे माजी उपसरपंच सुनीलराव बाकलीवाल,नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष पत्रकार सुधीर चव्हाण,गो–सेवक परवेज पठाण,आयोजक शांतवन खंडागळे,सोमनाथ साठे यावेळी उपस्थित होते.



यावेळी बोलताना महंत श्री सुनीलगिरी महाराज म्हणाले की जय मल्हार मित्र मंडळाने आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेमुळे ग्रामिण भागातील खेळाडूंना निश्चितच ऊर्जा मिळणार आहे,मोबाईलमध्ये गुंतलेल्या भावी पिढीने त्यातून बाहेर पडून मैदानी खेळाकडे वळावे असे आवाहन केले.

यावेळी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करतांना नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे म्हणाले की ग्रामीण भागातील खेळाडू मधूनच खरे देशासाठी लढणारे खेळाडू तयार होत असतात, मोठे ध्येय व उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन तुम्ही बिनधास्त खेळा,आम्ही गुन्हेगारांशी कबड्डी खेळायला सक्षम आहोत,चांगले शरीर कमवा,व्यसनांपासून दूर रहा,खेळाच्या माध्यमातून देशाचे नाव उज्वल करा असे आवाहन त्यांनी युवा खेळाडूंना केले.

या स्पर्धेसाठी मच्छिंद्रनाथ सेवाभावी फाउंडेशनचे अध्यक्ष व नाथभक्त दिलीपराव वाघ पाटील यांनी बक्षिसाच्या माध्यमातून खंबीर साथ या स्पर्धेसाठी दिली त्यांचा यावेळी सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# सोमवारी नगर परिषदेच्या वतीने विविध विकास कामांचे लोकार्पण

## संगमनेर शहरात सीसीटीव्हीची नजर वाढणार

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

–संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने सोमवार दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता संगमनेर शहरांमध्ये विविध ठिकाणी सीसीटीव्हीचे शुभारंभ तसेच फूड कोर्ट चे उद्घाटन समारंभ काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते व माजी आमदार डॉक्टर सुधीर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार सत्यजित तांबे यांच्या उपस्थितीमध्ये होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष डॉ सौ मैथिलीताई तांबे यांनी दिली आहे.

संगमनेर नगर परिषदेच्या वतीने होत असलेल्या विविध विकास कामांचे उद्घाटन व लोकार्पण कार्यक्रमाबाबत अधिक माहिती देताना नगराध्यक्ष डॉ मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर शहर वैभवशाली शहर ठरले आहे. आमदार सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून संगमनेर शहरातील नागरिक व महिलांची सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही विविध ठिकाणी बसवण्यात आले आहे. त्याचबरोबर शहरातील नागरिकांसाठी फूड कोर्ट खाऊ गल्ली निर्माण करण्यात आली आहे याच प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णपणे पुतळा, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्मारक, संविधान स्मारक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारक याबाबतची माहिती सुद्धा नागरिकांना दिली जाणार आहे.

संगमनेर नगर परिषदेच्या वतीने सोमवार दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता त्रिमूर्ती चौक, जनता



नगर कॉर्नर, संगमनेर बस स्थानक कॉर्नर ,चावडी, तीन बत्ती चौक, चंद्रशेखर चौक व नगरपालिका कोर्ट इमारत या ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे. तसेच सह्याद्री कॉलेज जवळ नेहरू गार्डन येथे फूड कोर्ट शुभारंभ करण्यात येणार आहे.

यानंतर ५.३० वाजता संगमनेर नगरपालिकेच्या प्रांगणामध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात माजी आमदार डॉ सुधीर तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यक्रम होणार आहे यावेळी आमदार सत्यजित तांबे, सौ दुर्गाताई तांबे, युवा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ जयश्रीताई थोरात,शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, सर्व माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, व विविध पक्षाचे व सामाजिक संघटनांचे प्रमुख पदाधिकारी या सर्वांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम होणार आहे.

तरी या उद्घाटन व लोकार्पण कार्यक्रमासाठी संगमनेर शहर व परिसरातील नागरिक महिला व युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, सर्व विभागांचे सभापती, सर्व नगरसेवक नगरसेविका, व मुख्याधिकारी डॉ. दयानंद गोरे यांनी केले आहे.

# डॉ. सोनाली कुटे : संघर्षातून यशस्वी झालेल्या ‘झाशीच्या राणी’ चा प्रेरणादायी जीवनप्रवास

वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक डॉक्टर येतात आणि जातात; मात्र काही व्यक्तिमत्त्वे आपल्या कार्याने, सेवाभावाने आणि माणुसकीच्या स्पर्शाने समाजाच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. अशाच प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांपैकी एक नाव म्हणजे डॉ. सोनाली

प्रदीप कुटे. रुग्णसेवेला जीवनाचे ध्येय मानून, अत्याधुनिक आरोग्य सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा ध्यास घेऊन त्यांनी संगमनेर परिसरात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना जिद्द, संघर्ष, शिक्षण, कर्तव्यनिष्ठा आणि सेवाभावाचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो. समाजसेवेच्या संस्कारातून घडलेले व्यक्तिमत्त्व.

डॉ. सोनाली कुटे यांचा जन्म नाशिक येथे ४ सप्टेंबर १९८५ रोजी झाला. सामाजिक जाणीव असलेल्या कुटुंबात त्यांचे बालपण गेले. घरातील संस्कार, समाजातील गरजू घटकांबद्दलची संवेदनशीलता आणि लोकांसाठी काहीतरी करण्याची प्रेरणा त्यांना लहानपणापासून मिळाली. बालपणापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या सोनाली यांनी आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित केले होते. समाजासाठी उपयोगी ठरणारे क्षेत्र निवडायचे आणि त्यातून माणसांची सेवा करायची, ही भावना त्यांच्या मनात होती. याच विचारातून त्यांनी वैद्यकीय क्षेत्राची निवड केली. वैद्यकीय शिक्षणाचा कठीण पण यशस्वी प्रवास–

डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी मोठी मेहनत घेतली. वैद्यकीय शिक्षण । पूर्ण करताना अनेक आव्हानांचा सामना केला; मात्र जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर त्यांनी यश मिळविले. त्यांनी एम.बी.बी.एस. शिक्षण पूर्ण केल्यानंतर भूलतज्ज्ञ या महत्त्वपूर्ण वैद्यकीय शाखेत विशेष प्राविण्य मिळविले. मुंबई येथील प्रतिष्ठित डखजछ मेडिकल कॉलेज मधून त्यांनी पुढील शिक्षण पूर्ण केले. वैद्यकीय ज्ञानासोबतच रुग्णांशी संवाद साधण्याची कला आणि त्यांच्याप्रती असलेली आपुलकी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खास वैशिष्ट्ये ठरली.

कुटुंबाची साथ आणि सेवाव्रताची नवी सुरुवात – वैद्यकीय क्षेत्रातील वाटचालीदरम्यान त्यांचा विवाह डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे यांच्याशी झाला. दोघांनीही वैद्यकीय सेवेला

वाढदिवस शुभेच्छा

सर्वोच्च स्थान देत समाजासाठी काहीतरी मोठे करण्याचा संकल्प केला. याच सेवाभावातून संगमनेर येथे कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर ची स्थापना करण्यात आली. सुरुवातीपासूनच या रुग्णालयाचे उद्दिष्ट केवळ उपचार करणे नव्हते, तर रुग्णांना विश्वास, आधार आणि उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हे होते. आज कुटे हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि अनुभवी वैद्यकीय कर्मचारी यांच्या माध्यमातून हजारो रुग्णांना लाभ मिळ आहे.

वैद्यकीय व्यवसाय सांभाळत असताना घरी कुटुंबाची जबाबदारी देखील तेवढ्याच क्षमतेने, आनंदाने सांभाळत आहेत. कुटुंबाचे सौंदर्य आणि सौहार्द कायम जपले. ज्येष्ठांची काळजी, मुलांना चांगले शिक्षण आणि चांगले संस्कार देण्यासाठी कायम पुढाकार घेतात. कोरोना काळातील देवदूतासारखी सेवा–

२०२० मध्ये जगभर आलेल्या कोरोना महामारीच्या काळात आरोग्य क्षेत्रासमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. या कठीण परिस्थितीत अनेक जण घरी सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करत असताना डॉक्टर, आरोग्य कर्मचारी मात्र जीव धोक्यात घालून रुग्णसेवा करत होते. या काळात डॉ. सोनाली कुटे यांनी आपल्या कर्तव्याला सर्वोच्च प्राधान्य दिले. रुग्णांना उपचार देणे, त्यांना मानसिक आधार देणे आणि त्यांच्या कुटुंबीयांना धीर देणे हे कार्य त्यांनी अविरतपणे केले. त्यांच्या या

सेवाभावामुळे अनेक रुग्ण आणि कुटुंबांच्या

मनात त्यांच्याबद्दल आदराची भावना निर्माण झाली.

गरीब व गरजूंसाठी कायम मदतीचा हात– डॉ. सोनाली कुटे यांची खरी ओळख त्यांच्या संवेदनशील मनात आहे. आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेणे कठीण असलेल्या अनेक रुग्णांना त्यांनी मदतीचा हात दिला आहे. आरोग्याबाबत जनजागृती करणे, महिलांच्या आरोग्याच्या प्रश्नांकडे लक्ष देणे आणि समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचविणे यासाठी त्या नेहमी प्रयत्नशील असतात. त्यांच्यासाठी डॉक्टरकी हा केवळ व्यवसाय नसून एक सामाजिक जबाबदारी आहे. रुग्णांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच त्यांच्या कार्याचे खरे यश आहे. महिलांसाठी प्रेरणादायी आदर्श एक महिला डॉक्टर, यशस्वी उद्योजिका, कुशल प्रशासक आणि संवेदनशील समाजसेविका म्हणून डॉ. सोनाली कुटे यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. कुटुंबाची जबाबदारी सांभाळत वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी वाटचाल करणे आणि समाजासाठी वेळ देणे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष गुण आहेत. आज

**वाढदिवस शुभेच्छा**



अनेक तरुणी आणि महिला त्यांच्याकडे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून पाहतात.

सेवेच्या वाटेवर अखंड प्रवास डॉ. सोनाली कुटे यांचा प्रवास हा केवळ एका डॉक्टरच्या यशाची कहाणी नाही, तर माणुसकी जपणाऱ्या एका संवेदनशील व्यक्तीचा प्रेरणादायी जीवनपट आहे. ज्ञान, मेहनत, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांच्या जोरावर त्यांनी आरोग्य क्षेत्रात विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त संगमनेर परिसरातील हजारो रुग्ण, मित्रपरिवार, सहकारी आणि शुभचिंतकांकडून त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत. आरोग्यसेवेच्या माध्यमातून समाजाच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणाऱ्या डॉ. सोनाली प्रदीप कुटे यांच्या हातून अशीच निरंतर सेवा घडत राहो, त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, यश आणि समाधान लाभो, हीच वाढदिवसानिमित्त सदिच्छा.

**– आण्णासाहेब थोरात**
**मॅनेजर,**
**कुटे हॉस्पिटल, संगमनेर**

## उपेक्षित कलेला मिळाली नवी उभारी; जामखेडच्या नटराज कलाकेंद्रात लावणी महोत्सव संपन्न

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

जामखेड येथील नटराज कलाकेंद्रात पारंपरिक आणि लोककलेवर आधारित लावणी महोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. ढोलकीचा ठेका, घुंगरांचा नाद, लावणीतील ठसकेबाज अदाकारी आणि कलाकारांच्या सादरीकरणाने संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. मात्र, या रंगमंचावर दिसणाऱ्या मनोरंजनाच्या मागे असंख्य कलाकारांचे कष्ट, संघर्ष आणि त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाची कहाणी दडलेली आहे.

लावणी म्हटले की अनेकांच्या डोळ्यासमोर केवळ मनोरंजनाचे चित्र उभे राहते. मात्र, ग्रामीण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात या कलेचे स्थान यापेक्षा कितीतरी मोठे आहे. पिढ्यान् पिढ्या जपली गेलेली ही लोककला आजही अनेक कलाकारांच्या जगण्याचा आधार बनली आहे. जामखेड परिसरातील विविध कलाकेंद्रांच्या माध्यमातून ही परंपरा पुढे नेण्याचे काम सातत्याने सुरू आहे.

कलेच्या रंगमंचामागे संघर्षाचे आयुष्य

कलाकेंद्रातील कार्यक्रम सुरू असताना रंगमंचावर कलाकार आपल्या कलेतून प्रेक्षकांचे मनोरंजन करतात; मात्र पडद्यामागे त्यांच्या आयुष्याचा संघर्ष सुरू असतो. या कलेवर हजारो महिला कलाकार आपली कला आणि मेहनत पणाला लावून काम करीत आहेत. अनेक कलाकारांसाठी हे केवळ हौसेचे किंवा छंदाचे क्षेत्र नसून त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे.

घरची परिस्थिती सांभाळत, कुटुंबाची जबाबदारी पेलत आणि आपल्या कलेला जपत अनेक महिला कलाकार या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या पावलांतील घुंगरू केवळ तालावर वाजत नाहीत, तर त्या घुंगरांच्या आवाजात त्यांच्या मेहनतीची आणि जगण्याची कहाणीही दडलेली आहे.

# १ १ ५ दिव्यांगांना साहित्य वाटप

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

जिल्हा दिव्यांग पुनवर्सन केंद्र पुणे व जुन्नर पंचायत समितीच्या वतीने ०४ सप्टेंबर रोजी प्रतिक चन्नावार गटविकास अधिकारी पंचायत समिती जुन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली जुन्नर तालुक्यातील दिव्यांग लोकांना कुत्रिम हात,पाय , कॅलिपरचे तपासणी व लगेच जागेवर साहित्य वाटप आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे उद्घाटन जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमलाताई शेळकंदे उपसभापती अमित ढोले, महेश पाटील सहाय्यक गटविकास अधिकारी व अधिकारी व संघटनेचे पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले

या वेळी सभापती कमलाताई शेळकंदे यांनी उपस्थित जुन्नर तालुक्यातील दिव्यांग,अधिकारीपदाधिकारी यांचे स्वागत करुन दिव्यांग लोकांच्या विविध अडचणी व घरपट्टी ५०% सुट ग्रामपंचायत चा ५ टक्के निधी दिव्यांगांना घरकुल तसेच शासकीय योजना व दिव्यांगांना इतर आवश्यक साहित्य मोफत वाटप व अडचणी लवकरच तालुक्यातील दिव्यांग सामाजिक संघटनेचे सर्व पदाधिकारी सोबत मिटिंग घेऊन सोडविण्यात येतील असे आश्वासन दिले या उपसभापती व संघटनेचे पदाधिकार्यांनी मार्गदर्शन केले या वेळी डॉ. रोहिणी कारंडे ड.ठ. ट्रस्ट व डॉ. शुश्रा कांबळे अँल्मिको राज शर्मा,शहारुख शहा यांच्या टीमने जागेवर दिव्यागं लाभार्थ्यांना तपासणी करून जागेवर कुत्रिम हात, पाय,कॅलिपर.बुट मान्यवरांच्या हस्ते ११५ दिव्यांग लोकांना वाटप करण्यात व आयटीसी संस्थेच्या वतीने वय १८ ते ४५ वयोगटातील महिला /पुरुष दिव्यांग लोकांना २ महीन्याचे मोफत क्मॅपुटर कोर्स व प्रक्षिशणानंतर ५०००/– रुपये शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे



# थोडक्यात पण महत्त्वाचे

## कार्यशाळेतून विद्यार्थिनींना निर्भयतेचे मार्गदर्शन

### कन्या विद्यालयाचा स्तुत्य उपक्रम



श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजया राजे शिंदे कन्या विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या औचित्य साधून हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थिनींसाठी माणुसकीची शाळा या लोक चळवळी अंतर्गत चला निर्भय होऊ या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली . यावेळी राष्ट्र सेवा दलाचे सदस्य श्री शिवाजीराव नाईकवडी यांनी विद्यार्थिनींना विविध मनोरंजक खेळांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री भूषण साळवे हे उपस्थित होते . तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजीराव नायकवडी व त्यांची टीम उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे यांनी केले. या कार्यशाळेत असुरक्षितते ची भावना, दडपण उदासीनता आत्मविश्वासाचा अभाव आणि यातून उद्भवलेल्या प्रसंगातून बाहेर कसे पडावे या संदर्भात मनोरंजक खेळ, पीपीटी, संवादात्मक चर्चा या माध्यमातून मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. क्रीडा विभाग प्रमुख श्री किरण कोकणी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. गुरुकुल प्रमुख श्री. किरण शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

## शैक्षणिक साहित्याची दही हंडी व शिक्षक दिन उत्साहात संपन्न

जुन्नर (समर्थ गांवकरी)



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिल्हेवाडी ता:-जुन्नर येथे शनिवार दि:-५ सप्टेंबर २०२६ गोपाळकाला,शिक्षकदिनानिमित्त आगळ्यावेगळ्या शैक्षणिक साहित्याच्या दही- हंडीचा व शिक्षक दिनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिल्हेवाडी सरपंच अनुसया भोईर उपस्थित होत्या यंदा शाळेने पारंपरिक दहीहंडीऐवजी शैक्षणिक साहित्याची दहीहंडी ही संकल्पना राबवली. दहीहंडीमध्ये वह्या,पुस्तके, पेन,पेन्सिल,खोडरबर, टोकयंत्र,स्केचपेन यांसारख्या शैक्षणिक साहित्याचासमावेश करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांनी तीन थराचे मानवी मनोरे रचून या हंडीचे पूजन केले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.त्यानंतरशिक्षक दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण न यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

मुख्याध्यापक प्रभाकर दिघे यांनी आपल्या मनोगतातून शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षका ची भूमिका महत्त्वाची असते असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनोद भोईर,उपाध्यक्ष राव साहेब भोईर,चंद्रकांत भोईर, गणेश भोईर,संजय ठोंगिरे, सुरेश मांडवे,तुकाराम बोकड, केशव भोईर मान्यवरउपस्थित होते.आभार उपशिक्षक जनार्दन केदारी यांनी मानले.

## २५ वर्षीय कार चालकाचा अचानक हृदयविकाराने मृत्यू

मंचर (समर्थ गांवकरी)



भाविकांना भीमाशंकर येथे दर्शनासाठी घेऊन आलेल्या २५ वर्षीय कार चालकाचा अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने दुर्दैवी मृत्यू शनिवार दि.५ रोजी झाला. श्याम सखाराम रोकडे (वय २५, रा. सुसगाव, पुणे, ता. हवेली; मूळ रा. जिंतूर, जि. परभणी) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे रोकडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

शनिवारी श्याम हे बाणेर येथून स्वतःची कार घेऊन भाविकांना भीमाशंकर दर्शनासाठी घेऊन आले होते. दर्शनासाठी आल्यानंतर पार्किंग क्रमांक तीन येथे त्यांच्या छातीत अचानक दुखू लागले. त्यांना तातडीने तळेघर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले. तपासणी सुरू असतानाच त्यांना तीव्र झटका आला आणि ते कोसळले, अशी माहिती डॉक्टर प्रज्वल बाणखेले यांनी दिली.

# हजारो घरांत ज्ञानाचा दिवा लावण्याचे काम शिक्षक करतात : खासदार निलेश लंके

## शिक्षक दिनानिमित्त ४०० शिक्षकांचा सन्मान; पुढील वर्षी नगर जिल्ह्यातील सर्व शिक्षकांचा गौरव करण्याचा योगीराज गाडे यांचा संकल्प

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

समाजसेवेची अनेक कामे केली जातात; त्याची चर्चा आणि कौतुकही होते. मात्र कोणतीही अपेक्षा न ठेवता दररोज हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देत, त्यांच्या घरात ज्ञानाचा दिवा लावण्याचे काम शिक्षक करतात. समाज घडविणाऱ्या या शिक्षकांचा सन्मान करणे हीच खरी कृतज्ञता आहे, असे प्रतिपादन खासदार डॉ. निलेश लंके यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त नगरसेवक योगीराज गाडे यांच्या वतीने आयोजित सुमारे ४०० शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते खासदार डॉ. निलेश लंके होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य सतीशचंद सूर्यवंशी, तर प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांची होती.

माजी क्रीडाधिकारी अजय पवार, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, सीताराम काकडे, भास्करराव जऱ्हाट, नगरसेवक योगीराज गाडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

खासदार डॉ. निलेश लंके म्हणाले, ''महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम शिक्षक करीत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना संस्कार, दिशा आणि जीवनाची मूल्ये देत शिक्षक समाज घडवितात. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान हा समाजाचा सन्मान आहे.''

माजी क्रीडाधिकारी अजय पवार म्हणाले, समाजाचा पायाभूत आधार शिक्षक असतो. मुलाची जडणघडण शाळेत होत असते. विद्यार्थ्यांमधील गुण हेरून त्यांना योग्य दिशा देण्याचे काम शिक्षकांनी केले, तर ते विद्यार्थी देशासाठी सक्षम नागरिक बनू शकतात.

माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी मराठी शाळा व मराठी भाषेच्या संवर्धनाची गरज व्यक्त केली. मराठी भाषेची नाळ तुटता कामा नये. मराठी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्यास पालकांचा पुन्हा मराठी शाळांकडे कल वाढेल, असे त्यांनी सांगितले.

नगरसेवक योगीराज गाडे म्हणाले, ''आर्मीचे जवान देशाचे संरक्षण करून देशसेवा करतात; त्याचप्रमाणे शिक्षकही समाज घडवून देशसेवा करतात. आज मी जो काही घडलो आहे, त्यामध्ये माझ्या शिक्षकांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे शिक्षकांप्रती माझ्या मनात सदैव आदर आहे. पुढील वर्षी संपूर्ण नगर जिल्ह्यातील सर्व शिक्षकांचा सन्मान करण्याचा संकल्प केला आहे. शिक्षकांकडून प्रेरणा घेऊन समाजासाठी निस्वार्थपणे काम करत राहू.''





शिक्षकांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाला सलाम करणारा हा सोहळा ठरला. 'शिक्षक घडवतो व्यक्ती... आणि व्यक्ती घडवते समाज!' या विचारातून आयोजित करण्यात आलेल्या उपक्रमाला शिक्षक, शिक्षणप्रेमी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिनाथ लवांडे यांनी केले.

# दिलीप वळसे पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

आळेफाटा (समर्थ गांवकरी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्री पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती, थोर तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रा.अनिल पडवळ यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचे स्मरण केले.

शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले. प्राचार्य प्रल्हाद शिंदे यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व आजचे एकदिवसीय शिक्षक प्राचार्य सिद्धी गाडगे, आरती नाईक, यश त्रिभुवन, पायल खाडे, पूजा भांबेरे, अविष्कार पोखरकर, अनुष्का डुकरे, क्रांती जगदाळे, प्रणव उनवणे, सुमित वाघ, महीनुर पठाण, मिसबा पटेल, प्रतीक डुकरे, रुबीना मनियार, आरती भोजने, ऋतिक राक्षे, साई सोनवणे, अनुष्का अंजुम पटेल हे विद्यार्थी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा

पाथर्डी (समर्थ गांवकरी)

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षक दिनाचे महत्त्व अधोरेखित केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे तर व्यासपीठावर पर्यवेक्षक सलीम शेख, प्रा ब्रम्हानंद दराडे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ अशोक डोळस, डॉ वैशाली आहेर, प्रा आशा पालवे, एकदिवसीय प्राचार्य साहिल शेख, हिना शेख उपस्थित होते. यावेळी सत्कार समारंभ तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे मनोगत आयोजित करण्यात आले. शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनोगतातून शिक्षकांचे जीवन घडविण्यातील योगदान, त्यांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यातील शिक्षकांची भूमिका याविषयी भावना व्यक्त करण्यात आल्या.

प्रा. सलीम शेख तसेच डॉ वैशाली आहेर यांनी शिक्षक मनोगत व्यक्त केले. तसेच पंकज बुधवंत, मारिया सिरसे, कशीश तांबोळी, शितल बडे, शितल शिरसाट, अभिषेक गायकवाड, मानसी खुटके, आकाश धनगर, अलोक बंग, प्रतिज्ञा रासकर, कांचन गव्हाने व सय्यद खुशी आदी एकदिवसीय शिक्षक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. बबन चौरे यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगत शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन हे राष्ट्रपती पेक्षाही हाडाचे शिक्षक म्हणून जास्त लोकप्रिय होते. भारताचे थोर शिक्षणतज्ञ म्हणून त्यांना ओळखले जाते. आपल्या जीवनात आपल्यावर निस्वार्थ प्रेम करणारे आई वडील यांच्यानंतर शिक्षक असतात. आपला शिष्य मोठा व्हावा, कर्तुत्ववान व्हावा हे प्रत्येक शिक्षकाला अपेक्षित असते.


# हजारो घरांत ज्ञानाचा दिवा लावण्याचे काम शिक्षक करतात : खासदार निलेश लंके

## शिक्षक दिनानिमित्त ४०० शिक्षकांचा सन्मान; पुढील वर्षी नगर जिल्ह्यातील सर्व शिक्षकांचा गौरव करण्याचा योगीराज गाडे यांचा संकल्प

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

समाजसेवेची अनेक कामे केली जातात; त्याची चर्चा आणि कौतुकही होते. मात्र कोणतीही अपेक्षा न ठेवता दररोज हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देत, त्यांच्या घरात ज्ञानाचा दिवा लावण्याचे काम शिक्षक करतात. समाज घडविणाऱ्या या शिक्षकांचा सन्मान करणे हीच खरी कृतज्ञता आहे, असे प्रतिपादन खासदार डॉ. निलेश लंके यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त नगरसेवक योगीराज गाडे यांच्या वतीने आयोजित सुमारे ४०० शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते खासदार डॉ. निलेश लंके होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य सतीशचंद सूर्यवंशी, तर प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. शशिकांत गाडे यांची होती.

माजी क्रीडाधिकारी अजय पवार, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, सीताराम काकडे, भास्करराव जऱ्हाट, नगरसेवक योगीराज गाडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

खासदार डॉ. निलेश लंके म्हणाले, ''महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम शिक्षक करीत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना संस्कार, दिशा आणि जीवनाची मूल्ये देत शिक्षक समाज घडवितात. त्यामुळे शिक्षकांचा सन्मान हा समाजाचा सन्मान आहे.''

माजी क्रीडाधिकारी अजय पवार म्हणाले, समाजाचा पायाभूत आधार शिक्षक असतो. मुलाची जडणघडण शाळेत होत असते. विद्यार्थ्यांमधील गुण हेरून त्यांना योग्य दिशा देण्याचे काम शिक्षकांनी केले, तर ते विद्यार्थी देशासाठी सक्षम नागरिक बनू शकतात.

माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी मराठी शाळा व मराठी भाषेच्या संवर्धनाची गरज व्यक्त केली. मराठी भाषेची नाळ तुटता कामा नये. मराठी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्यास पालकांचा पुन्हा मराठी शाळांकडे कल वाढेल, असे त्यांनी सांगितले.

नगरसेवक योगीराज गाडे म्हणाले, ''आर्मीचे जवान देशाचे संरक्षण करून देशसेवा करतात; त्याचप्रमाणे शिक्षकही समाज घडवून देशसेवा करतात. आज मी जो काही घडलो आहे, त्यामध्ये माझ्या शिक्षकांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे शिक्षकांप्रती माझ्या मनात सदैव आदर आहे. पुढील वर्षी संपूर्ण नगर जिल्ह्यातील सर्व शिक्षकांचा सन्मान करण्याचा संकल्प केला आहे. शिक्षकांकडून प्रेरणा घेऊन समाजासाठी निस्वार्थपणे काम करत राहू.''




# जगतगुरु तत्वदर्शी संत रामपाल जी महाराज यांच्या ७६ व्या अवतरण दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जगतगुरु तत्वदर्शी संत राम पाल जी महाराज यांच्या ७६ व्या अवतरण दिवसाच्या निमित्ताने सतलोक आश्रम ढवळपुरी येथे तीन दिवसीय विशाल भंडारा व रक्तदान शिबिराचे व आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम दि. ०६, ०७ व ०८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजेपासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे. यानिमित्ताने संत गरीबदास जी महाराज यांच्या अमरवाणीचा अखंड पाठ होणार आहे.

कार्यक्रमातील प्रमुख उपक्रम:

- हुंडामुक्त विचार प्रबोधन
- रक्तदान शिबिर
- निःशुल्क नामदीक्षा
- आध्यात्मिक प्रदर्शनी



स्थळ: सतलोक आश्रम ढवळपुरी, गाव ढवळपुरी, तालुका पारनेर, जिल्हा अहिल्यानगर.

संपर्क: ९९९२६०००६२०, ९९९२६०००६२०

या महासमागमासाठी आपण सर्वांनी सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन सतगुरु रामपाल जी महाराज यांच्या सर्व संगतच्या वतीने करण्यात आले आहे.

# जोशी वस्तीत भटके विमुक्त दिनानिमित्त जात प्रमाणपत्र व रेशन कार्डचे वाटप

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

जोशी वस्ती (ता. श्रीगोंदा) येथे ग्रामीण विकास केंद्र व मासूम संविधान संवर्धन फेलोशिप कार्यक्रमाच्या वतीने भटके विमुक्त दिनानिमित्त समाजप्रबोधन मेळावा तसेच शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत जात प्रमाणपत्र व रेशन कार्ड वितरण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमाताई जाधव होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी रूपचंद सावंत, प्रशांत खामकर, संभाजी बोरुडे, इगावे भाऊसाहेब, पुष्कर कडू (झख) आदी उपस्थित होते. लता शिंदे यांनी प्रास्ताविकातून ३१ ऑगस्ट भटके विमुक्त दिनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली.

प्रशांत खामकर यांनी भटके विमुक्त समाजाच्या विधा, परंपरा तसेच ब्रिटिश काळातील जाचक नियम यांबाबत मार्गदर्शन केले. संभाजी बोरुडे यांनी भारतीय संविधानातील तरतुदी आणि स्वातंत्र्यानंतर भटक्या विमुक्त समाजाच्या परिस्थितीवर भाष्य केले. रूपचंद सावंत यांनी समाजाच्या आजच्या प्रश्नांवर भूमिका मांडली, तर पुष्कर कडू यांनी गुन्हेगारी कायद्याबाबत माहिती दिली. उमाताई जाधव यांनी भटके विमुक्त दिनाचे महत्त्व सांगितले.

यावेळी खासदार निलेश लंके यांनी भटक्या विमुक्त समाजाला आजही नागरिकत्वाचे पुरावे, जात प्रमाणपत्र, घरकुल, जागा, आधार कार्ड, मतदान कार्ड आदींसाठी अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगितले. या समाजातील मुलांचे शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षांपासून शासकीय जागेवर वास्तव्यास असलेल्या भटके विमुक्त कुटुंबांना त्यांच्या राहत्या जागेचा कायम स्वरूपी हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच आवश्यक शासकीय कागदपत्रे मिळवून देण्यासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचे सांगितले. जोशी वस्तीला प्रवेशद्वार देण्याचेही आश्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमात १५० जात प्रमाणपत्रे व २० रेशन कार्डांचे खासदार निलेश लंके यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. जात प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल लता शिंदे यांचा खासदार लंके यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष चव्हाण यांनी केले. यावेळी तहसील कार्यालयाचे सहाय्यक अधिकारी कारकिले, आदिवासी युवा क्रांती संघटनेचे अजित भोसले, सामाजिक कार्यकर्त्या लता शिंदे, जिल्हा प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक ईश्वर गोरे, ग्रामीण विकास केंद्राच्या कार्यकर्त्या पल्लवी शेलार, राजश्री लष्करे, ऋषिकेश गायकवाड, राहुल पवार, मुमताज मुलानी, राजू शिंदे, सुनील लष्करे, रोहित रोडे, गंगाराम मले, भिवा वीरकर, भारत माळवे, मोहन





बाबर, दादाजी शिंदे, कचरू वाहेकर, सचिन मुंडेकर, विकास वाहेकर, अनिल पोटे, अनिता केदळे, सिंधूताई शिंदे, गणेश तांबवे आदी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### बाबुजी आव्हाड महाविद्यालयामध्ये रक्तदान शिबिर संपन्न

**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा पाथर्डी नगरपालिकेचे नगराध्यक्ष मा .अभय आव्हाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी व नित्यसेवा ब्लड सेंटर , श्रीरामपूर,राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना विभाग बाबूजी आव्हाड महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेनेचे छात्र यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन मा. ॲड सुरेशराव आव्हाड यांच्या शुभहस्ते संपन्न

### आदर्श पिढी घडविण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांचा एकमेकांवर विश्वास आवश्यक : प्राचार्य विद्याचंद्र सातपुते



**अकोले (समर्थ गांवकरी)**

आदर्श पिढी घडविण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी यांचा एकमेकांवर विश्वास आवश्यक असल्याचे प्रतिपादन आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज चे सम न्वयक तथा आय टी आय चे माजी प्राचार्य विद्याचंद्र सातपुते यांनी केले.

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज, वीरगाव येथे विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी कॉलेज चे प्राचार्य प्रा.विनोद गिरी होते. यावेळी व्यासपीठावर सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

प्रा.सातपुते पुढे म्हणाले की,शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते एकमेकांना विश्वासाचे असणे गरजेचे आहे. शिक्षकीपेशाला समाजात मान सन्मान असून विद्यार्थी घडविणे हेच एकमेव ध्येय शिक्षकांचे असणे गरजेचे आहे.कारण शिक्षक चुकला तर संपूर्ण भावी पिढीचे नुकसान होईल.असे सांगत संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सेक्रेटरी डॉ.,अनिल रहाणे यांनी संस्थेला चांगले प्राध्यापक दिले आहे. सर्व प्राध्यापक शिक्षण क्षेत्रातच काम करण्याच्या हेतूने आलेले आहेत. त्या हेतूने ते आपली पुढील शैक्षणिक अहर्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे ही बाब सर्वांसाठी भूषणावह आहे. शिक्षक दिनानिमित्त झालेले विद्यार्थी शिक्षक यांनी गुरुजनांचा सन्मान करण्याच्या दृष्टीने केलेले नियोजन उत्कृष्ट होते.विद्यार्थी ज्यावेळी चांगले घडतात व आपल्या करीयर मध्ये उत्कृष्ट होतात तोच खरा शिक्षकांचा सन्मान असतो.असे सांगत आपण शिक्षक का झालो,कसे घडत गेलो याबाबत सांगितले. व सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्राचार्य विनोद गिरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. शिक्षक दिनाचे प्राचार्य झालेले विद्यार्थी आर्यन काचले यांनी प्राचार्य पद सांभाळणे किती कठीण आहे याचे उदाहरण देऊन आपला अनुभव सांगितला.

यावेळी सर्व शिक्षक झालेल्या विद्यार्थ्यांनी दिवसभर लेक्चर घेतले व कॉलेजचे कामकाज पाहिले.

सर्व शिक्षकांचा पेन, गुलाबपुष्प देऊन सन्मान केला.

तर २०२५-२६ या वर्षाचा फॅकल्टी ऑफ द इअर चा पुरस्कार सिव्हील इंजिनीअरिंग विभागाचे प्राध्यापक आकाश डोखे सर यांना देऊन सन्मानित करण्यात आले.संस्थेने मला फ़ॅकल्टी ऑफ द इअर चा पुरस्कार देऊन माझा सन्मान केला,हा सन्मान माझा वैयक्तिक नसून माझ्या सर्व सहकाऱ्यांचा सन्मान आहे असे मनोगत प्रा.आकाश डोखे यांनी सांगितले.

सूत्रसंचालन दिशा बगाड व शर्वरी शेळके या विद्यार्थ्यांनिनी केले तर आभार आर्यन काचले यांनी मानले.

### मुंबई 'मेट्रो-३' ची सेवा मध्यरात्री १२ वाजेपर्यंत

**१८ इंचाच्या गणपती बाप्पालाही प्रवासाची परवानगी**

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मुंबईचा सर्वात मोठा आणि उत्साहाचा सण असलेल्या गणेशोत्सवासाठी 'मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन'ने (चींलरळ चशीी ठरळश्र ऊींीिंेळेप) मुंबईकरांना एक मोठा दिलासा दिला आहे. गणेशोत्सवाच्या (ऋरपशीहेीर्री २०२६) काळात गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुखकर, जलद आणि सुरक्षित व्हावा यासाठी कुलाबा-वांद्रे-सीप्झ म्हणजेच मेट्रो लाईन-३ (ॲक्वा लाईन) ची सेवा १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ दरम्यान मध्यरात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

शेवटच्या मेट्रोच्या वेळेत वाढ

सध्याच्या वेळापत्रकानुसार कफ परेड आणि आरे जेव्हीएलआर (रीशू गतडठ) या दोन्ही टर्मिनल स्थानकांवरून रात्री १०:३० वाजता शेवटची मेट्रो सुटते. मात्र, गणेशोत्सवाच्या काळात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या काळात ही वेळ वाढवून मध्यरात्री १२:०० वाजेपर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे लालबाग, सिद्धिविनायक, दादर, गिरगाव यांसारख्या प्रमुख ठिकाणच्या गणेश मंडळांना आणि बाप्पाच्या दर्शनाला जाणाऱ्या भाविकांना रात्री उशिरा घरी परतताना मोठा दिलासा मिळणार आहे.

# शेतकऱ्यांना दिवसा वीज द्या; अन्यथा तीव्र आंदोलन

**संगमनेर खुर्द (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यात पश्चिम विभागात तसेच सर्वच ग्रामीण भागात वीज वितरण कंपनीचा गलथाण कारभार समोर आला असून, महावितरण चा मनमानी कारभारामुळे, बळीराजाचे कंबरडे मोडले आहे.

रात्रीच्या अंधारात बिबटे-सरपटणारे प्राणी, साप यांच्या भीतीने शेतीला पाणी देणे मुश्किल झाले आहे., उभी पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत.

धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांमधील शेतकऱ्यांना सध्या शेतीसाठी रात्री ९.४५ ते पहाटे ५.४५ वाजेपर्यंत वीजपुरवठा करण्यात येत आहे. संपूर्णपणे रात्रीच्या अंधारात मिळणाऱ्या या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर समस्या निर्माण झाली असून, परिसरामध्ये वाढलेल्या बिबटे व वाघांच्या वावरामुळे शेतात जाण्यास शेतकरी धास्तावले आहेत.

रात्रीच्या वेळी जीव धोक्यात घालून शेतकऱ्यांना पिकांना पाणी द्यावे लागत आहे. अनेक शेतकरी वन्यप्राण्यांच्या भीतीमुळे रात्री शेतात जाणे टाळत असल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. परिणामी अनेक पिके पाण्याअभावी सुकण्याच्या मार्गावर असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

या गंभीर प्रश्नाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांतील शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ कोकणे यांनी केली आहे.

शेजारील अकोले तालुक्यात काही भागांमध्ये दोन शिफ्टमध्ये वीजपुरवठा करण्यात येत असून,काही भागांतील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून दिली जात आहे. मग धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांवरच रात्रीच्या अंधारात शेती करण्याची वेळ का यावी, असा सवालही शेतकऱ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे.



धांदरफळ खुर्द वीज वितरण कंपनी अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये धांदरफळ, बु, खुर्द, नांदुरी दुमाला, कवठे धांदरफळ, निमज, निमगाव बु, खुर्द, सावरचोळ, मेंगाळवाडी, शिरसगाव, धुपे इ.गावांमधील शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत सात तास वीजपुरवठा करण्यात यावा. तसेच रात्रीच्या वेळेला वीजपुरवठ्यात बदल करून शेतकऱ्यांना दिवसा किमान आठ तास वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी पंचक्रोशी तील शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

शेतकऱ्यांच्या पिकांचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला असून,वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे शेतकऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने तातडीने यावर योग्य तो निर्णय घेऊन वीजपुरवठ्याच्या वेळेत बदल करावा. अन्यथा येत्या दोन दिवसांत धांदरफळ खुर्द येथील वीज वितरण उपकेंद्रावर शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सामाजिक कार्यकर्ते दत्ता कोकणे यांनी दिला आहे.

# धोत्रे येथे १५ लाखांच्या सभामंडपाचे लोकार्पण; दशक्रिया विधी घाटासाठीही १५ लाखांचे आश्वासन

**मी काम करणारा माणूस आहे, काम करतच राहणार : सुजित झावरे पाटील**

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील धोत्रे गावात सुमारे १५ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या सभामंडपाचे लोकार्पण सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना त्यांनी धोत्रे गावाशी असलेल्या जुन्या ऋणानुबंधांना उजाळा देत भविष्यातही गावाच्या विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली.

सुजित झावरे पाटील म्हणाले, मी काम करणारा माणूस आहे. पद असो अथवा नसो, विकासकामे करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत राहिलो आहे आणि यापुढेही काम करतच राहणार आहे. धोत्रे गावाशी आमच्या कुटुंबाचे अनेक वर्षांचे जिव्हाळ्याचे नाते असून, गावानेही प्रत्येक अडचणीच्या काळात आमच्या कुटुंबाला प्रेम आणि साथ दिली आहे.

झावरे कुटुंबाचे जुने नाते

यावेळी बोलताना सुजित झावरे पाटील यांनी स्व. आमदार वसंतराव झावरे पाटील यांच्या माध्यमातून धोत्रे गावात झालेल्या विकासकामांचा उल्लेख केला. त्यांच्या विचारांचा आणि विकासकामांचा वारसा पुढे नेत स्वतःही गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले.

मी जिल्हा परिषद उपाध्यक्ष असताना धोत्रे गावासाठी प्रवेशद्वार, आरोग्य उपकेंद्र, पाणी योजना, सभामंडप, रस्ते, शाळेच्या खोल्या, दहनभूमी, बंधारे यासह अनेक विकासकामे मार्गी लावली. गावाच्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देत उपलब्ध माध्यमातून जास्तीत जास्त विकासकामे करण्याचा प्रयत्न केला, असे त्यांनी स्पष्ट केले.

गावानेही झावरे कुटुंबावर कायम विश्वास ठेवला असून, प्रत्येक अडचणीच्या प्रसंगी ग्रामस्थांनी प्रेमाने आणि खंबीरपणे साथ दिल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे गावाच्या विकासासाठी काम करणे ही केवळ जबाबदारी नसून कर्तव्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

दशक्रिया विधी घाटासाठी १५ लाखांचे आश्वासन

सभामंडपाच्या लोकार्पणानंतर सुजित झावरे पाटील यांनी धोत्रे येथील दशक्रिया विधी घाटाच्या विकासकामांसाठी १५ लाख रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन दिले. घाट परिसरात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि नागरिकांना चांगल्या सोयी मिळाव्यात यासाठी विकासकामे करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे गावातील या महत्त्वाच्या प्रश्नाला आता गती मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे.

विकासाचा प्रवास असाच सुरू राहणार

विकास हा एखाद्या एका पदापुरता किंवा काळापुरता मर्यादित नसतो, असे सांगत सुजित झावरे पाटील म्हणाले, गावातील नागरिकांच्या गरजा ओळखून त्या सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे महत्त्वाचे आहे. मी काम करणारा माणूस आहे आणि काम करतच राहणार आहे. धोत्रे गावाने माझ्यावर आणि आमच्या कुटुंबावर जे प्रेम केले आहे, त्याची जाणीव कायम आहे.

गावाच्या विकासासाठी भविष्यातही जे काही करता येईल ते करण्याचा प्रामाणिक प्रयत्न राहील. सभामंडपाच्या लोकार्पणामुळे गावातील सामाजिक, धार्मिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी ग्रामस्थांना चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण होते.

लोकार्पण सोहळ्यास अरुणराव ठाणगे, अमोल साळवे, स्वप्नील राहीन्ज यांच्यासह ग्रामस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली. सभामंडपानंतर आता दशक्रिया विधी घाटाच्या विकासासाठी १५ लाखांचा निधी उपलब्ध होणार असल्याने धोत्रे गावाच्या विकासाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

# 'ज्ञानसंपदा शाळेत उत्साहात दहीहंडी उत्सव'

**श्रीकृष्ण-राधेच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी वाढविला उत्सवाचा रंग; ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष**



**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

भारतीय संस्कृतीतील पारंपरिक सण-उत्सवांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी आणि संस्कारक्षम पिढी घडावी, या उद्देशाने ज्ञानसंपदा शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला निमित्ताने उत्साहात दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त यंदाच्या दहीहंडी उत्सवाला विशेष स्वरूप देण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेच्या आकर्षक वेशभूषेत सहभागी होत उत्सवाची रंगत वाढविली. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने दहीहंडी फोडून आनंद व जल्लोष साजरा केला. ढोल-ताशांच्या गजरात संपूर्ण शाळेचा परिसर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणाने भारून गेला. सर्व विद्यार्थ्यांनी या पारंपरिक उत्सवाचा मनमुराद आनंद घेतला. श्रीकृष्णाने दिलेली प्रेम, मैत्री, धैर्य, कर्तव्यनिष्ठा, समता आणि सहकार्याची मूल्ये विद्यार्थ्यांच्या जीवनात रुजविण्याचा प्रयत्न शाळेच्या विविध उपक्रमांतून केला जातो. दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांचे महत्त्व अनुभवातून समजावून देण्यात आले. उत्सवानंतर सर्व विद्यार्थ्यांना गोपाळकाल्याचा प्रसाद तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आनंदात आणखी भर पडली.

# तरुणाई अडकली मोबाइलच्या विळख्यात

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

वयोवृद्धापासून ते चिमुकल्यांपर्यंत सर्वांनाच मोबाइलचा लळा लागला आहे. मोबाइलचा अतिवापर होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. तरुणाई मोठ्या प्रमाणात मोबाइलमध्ये अडकली आहे.

तसेच लहान मुलेही मोठ्या प्रमाणात मोबाइलच्या आहारी जात असल्याने दृष्टी कमी होण्याचा धोका वाढत आहे. गेल्या काही वर्षात संवादाचे माध्यम असल्याने तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला आहे. सध्या घरोघरी टीव्ही, मोबाइल, संगणक , लॅपटॉप आदी वस्तू दैनंदिन कामकाजासाठी वापरतात, नवीन पिढी तर यात पुढे आहे. सुरुवातीला सहज दिलेला मुलांच्या हातातला मोबाइल तर आता सवईचा भाग झाला आहे.

यामुळे डोळ्यांच्या अडचणी वाढत आहेत. नेत्र तज्ज्ञांकडे जाणारे बहुतांश नागरिक आपल्या मुलांची दृष्टी कमी झाल्यामुळे घेऊन जातात. लहान मुलांना रडू नये म्हणून मोबाईल हातात देऊन शांत करण्याचे प्रमाण वाढले आहे, मात्र यामुळे डोळ्यांचा धोका निर्माण होण्याची शंका आहे.काही मुले मोबाइलमध्ये गेम खेळताना दिसत आहेत.

स्मार्ट फोनमध्ये नवनवीन बदल झाले असून अनेक गेम यामध्ये समाविष्ट झालेले आहेत.यातील तरुणांचा कर्दनकाळ ठरलेल्या अनेक गेमच्या विळख्यात अनेक मुले आणि नागरिक सापडले आहेत. मोबाईलवर लुडोसारख्या अनेक गेममध्ये ते गुंतून राहतात, त्यामुळे जवळ असूनसुद्धा जवळच्याला बोलायला वेळ नसल्याचे चित्र दिसत आहे.

शहरी भागात अगोदरपासूनच मुलांच्या हातात मोबाईल होता, मात्र कोरोना साथीत सगळीकडे ऑनलाइन शिक्षण चालू झाले, तेव्हापासून ग्रामीण भागातही मोबाइल मुलांच्या हातात जास्त प्रमाणात आले आहेत. त्यामुळे आता सतत मोबाइल मुलांना हातात ठेवावा वाटत असल्याचे चित्र आहे. मोबाईलमुळे लहान

# निमगाव खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताह व भव्य दहीहंडी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**संगमनेर खुर्द (समर्थ गांवकरी)**



संगमनेर तालुक्यातील निमगाव खुर्द येथे, रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी शनिवार दि.२९ ऑगस्ट रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाने व हरिनाम संकीर्तनाने सप्ताह सुरुवात झाली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली संत तुकाराम महाराज व माधवगिरी महाराजांच्या कृपा आशीर्वादाने कृष्ण जन्माष्टमी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या निमि त्ताने विविध धार्मिक, व सामाजिक कार्यक्रम ाचे आयोजन निमगाव खुर्द ग्रामस्थ, सप्ताह कमेटी व भाविक भक्ताच्या सहयोगाने करण्यात आले आहे.

अखंड हरीनाम सप्ताह काळात सात दिवस भव्य कीर्तन सोहळा,ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, कृष्ण जन्म सोहळा, रक्त दान शिबीर, सर्व भाविक भक्तांसाठी रोज म्हाप्रसाद, तसेच सप्ताहच्या शेवटच्या दिवशी भव्य दहीहंडी सोहळा व सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे अयोजन करण्यात आले आहे.

# भाऊसाहेब दादा नवले पतसंस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा १३ सप्टेंबरला!

**२,२०२ सभासदांचा विश्वास; ९४ कोटी ११ लाखांची वार्षिक उलाढाल, ७ लाख ९ हजारांचा निव्वळ नफा!**

**अकोले (समर्थ गांवकरी)**

भाऊसाहेब दादा नवले तथा अकोले ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकोले या संस्थेची सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता संस्थेच्या कार्यालयात, वसंत मार्केटच्या पाठीमागे, अकोले येथे आयोजित करण्यात आली आहे. संस्थेचे विद्यमान चेअरमन सुर्यकांत उर्फ नंदूशेठ सदाशिव मैड यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार असून, संस्थेच्या आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा, आर्थिक पत्रके, नफा वाटणी, आगामी वर्षाचे अंदाजपत्रक तसेच संस्थेच्या भविष्यातील वाटचालीसंदर्भातील विविध विषयांवर सभेत विचारविनिमय होणार आहे.

संस्थेच्या २५ व्या वार्षिक अहवालानुसार, दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचे एकूण २ हजार २०२ सभासद आहेत. संस्थेचे वसूल भागभांडवल ११ लाख ३० हजार ५१० रुपये, निधी ४४ लाख ६७ हजार ७०९ रुपये, तर ठेवींचा एकूण आकडा १८ कोटी ४० लाख ४१ हजार ४३५ रुपये आहे. संस्थेने ३ कोटी ९२ लाख ४४ हजार ५० रुपयांची गुंतवणूक केली असून, येणे कर्जे १५ कोटी ८१ लाख १९ हजार १६२ रुपये आहेत. संस्थेचे खेळते भागभांडवल २० कोटी ४६ लाख ६९ हजार ७११ रुपये असून, वार्षिक उलाढाल तब्बल ९४ कोटी ११ लाख ५९ हजार ३२० रुपये झाली आहे. आर्थिक वर्षात संस्थेला ३३ लाख ८१ हजार ८८३ रुपयांचा ढोबळ नफा, तर ७ लाख ९ हजार ६०७ रुपयांचा निव्वळ नफा प्राप्त झाला आहे. संस्थेचा सी.डी. रेशो ८४.०२ टक्के असून, संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण अकोले तालुका आहे.

सभेत १३ विषयांवर होणार चर्चा: वार्षिक सर्वसाधारण सभेत मागील दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे, सन २०२५-२०२६ चा वार्षिक अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रकास मंजुरी देणे, संचालक मंडळाने तयार केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे, सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे आदी विषय मांडण्यात येणार आहेत. तसेच संस्थेच्या वतीने बाहेरील कर्ज उभारणीचा अधिकार संचालक मंडळास देणे, सन २०२६-२०२७ साठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करून त्यांच्या मानधनास मंजुरी देणे, सन २०२५-२०२६ चा लेखापरीक्षण अहवाल मंजूर करणे व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे, यावरही चर्चा होणार आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रात नवीन जागा अथवा इमारत उपलब्ध झाल्यास तेथे काऊंटर व फर्निचर तयार करण्याचा अधिकार संचालक मंडळास देण्याबाबतचा विषयही सभेपुढे ठेवण्यात आला आहे. सामोपचार परतफ `ड योजनेतील व्याज सवलत तसेच इतर कर्जावरील व्याज सवलतीस मंजुरी देणे आणि पुढील आर्थिक वर्षातही सवलत देण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे, संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांकडील कर्जाची नोंद घेणे, संचालक, कर्मचारी व सभासदांना सहकारी प्रशिक्षण देणे आदी विषयांवरही सभेत निर्णय घेतले जाणार आहेत. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवरही चर्चा होणार आहे.

सहकार क्षेत्रातील मार्गदर्शनामुळे संस्थेची वाटचाल: वार्षिक अहवालात चेअरमन सुर्यकांत उर्फ नंदूशेठ सदाशिव मैड यांनी संस्थेच्या प्रगतीमध्ये सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक, दैनिक ठेव प्रतिनिधी, संचालक मंडळ व कर्मचारी यांचे मोलाचे योगदान असल्याचे नमूद केले आहे. सहकार विभागाचे अधिकारी, तालुक्यातील विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी व कर्मचारी तसेच तालुका पतसंस्था फेडरेशनचे पदाधिकारी व अधिकारी यांच्याकडून वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन संस्थेच्या प्रगतीस उपयुक्त ठरत असल्याचे




त्यांनी सांगितले आहे.

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा, तर कर्ज वसुलीसंदर्भात ४ सभा घेण्यात आल्या. सहकार खात्याचे आदेश तसेच फेडरेशनच्या सूचनांची संस्थेने वेळोवेळी अंमलबजावणी केल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. सभासदांचा विश्वास कायम ठेवत आर्थिक शिस्त, कर्जवसुली, ठेवी वाढविणे आणि सहकाराच्या माध्यमातून सभासदांना सक्षम करण्याच्या उद्देशाने संस्थेची वाटचाल सुरू असल्याचे अहवालातून स्पष्ट होते. सर्व सन्माननीय सभासदांनी रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता अकोले येथील संस्थेच्या कार्यालयात होणाऱ्या २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन व्यवस्थापक एस. एन. अभंग यांनी केले आहे.